N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर   **P.S.(ठाणे):** बंडगार्डन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0058   **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 09/03/2026 18:49

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 7
   **Date From (दिंनाक पासून):** 03/02/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 03/02/2026
   **Time From (वेळेपासून):** 20:45 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 21:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 09/03/2026   **Time (वेळ):** 17:14 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 023

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 09/03/2026 17:14 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 0.2 किमी   **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बंडगार्डन पोलीस स्टेशन अंकित,ताडिवाला रोड पोलीस ,चौकी येथे वरच्या मजल्यावर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



चलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे

| | | |
|---|---|---|
| | ...युसुफ शेख | 3/4/2023 |
| 5 | अनुसया गंगाधर ढोणे | 3/4/2023 |
| 6 | राजेंद्र अंकुश सदगर | 8/4/2023 |
| 7 | अर्जुन धोंडीराम हजारे | 3/4/2023 |
| 8 | किशोर विलास अंबडकर | 3/4/2023 |

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निता चत्रभुज मिसाळ

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रितिबधक विभाग,पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रितिबधक विभाग,पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9822214414

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री संदिप खेडकर | | | 1. बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे , बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

माझे नाव श्रीमती निता चत्रभुज मिसाळ, पोलीस उपअधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मोबा.क्र. 9822214414

आज रोजी समक्ष हजर राहून फिर्यादी जबाब देते की, आम्ही दि.03/02/2026 रोजी 18.25 वाजता ला.प्र.वि. कार्यालयात हजर असताना पोलीस उपअधीक्षक श्री गावडे यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावून सदर ठिकाणी हजर असलेले तक्रारदार श्री ऋषी अनंत सुतार, वय 40 वर्षे, व्यवसाय – कन्स्ट्रक्शन, रा. 32/2, सुयोग सोसायटी, प्रतिभा नगर, धनकवडी, पुणे -43 मो.नं. 9922818878 यांची व त्यांचे सोबत असणारे त्यांचे वकील अँड. श्री कुणाल खोपडे यांची ओळख करून दिली व त्यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणीबाबत तक्रार असून ती घेवून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेशित केले व सदर कारवाईकामी पोहवा चंद्रकांत जाधव व पोशि प्रविण तावरे असे पथक मदतीकरीता दिले. तसेच सदर कारवाई करीता पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यालय, पिंपरी येथील दोन पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगितले. आम्ही तक्रारदार यांना आमचे कक्षात घेवून जावून त्यांची तक्रार ऐकुन घेतली. पोलीस उपअधीक्षक श्री गावडे यांनी दिलेल्या पत्रानुसार 19.47 वाजता पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील पंच लाप्रवि कार्यालयात आले. ते आमचे कक्षात आल्यानंतर त्यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांची नावे 1. श्री. अनिल सदाशिव पंडित, वय 43 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- आरेखक, बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-18 व 2. श्री. अमोल अशोक शिंदे, वय 38 वर्षे, व्यवसाय नोकरी पद – कनिष्ठ अभिंयता, बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम नियत्रण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी असे असल्याचे सांगितले.

आम्ही आमच्या कक्षात उपस्थित तक्रारदार, त्यांचे वकिल अँड. खोपडे व सापळा पथक, दोन्ही पंच या सर्वांची आपसात ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार श्री सुतार यांची लोकसेवकाविरुध्द लाचेची मागणी होत असलेबाबत तक्रार असून पंच म्हणुन हजर राहण्यास तयार असेलबाबत त्यांची संमती घेतली. तसेच लाच मागणीचे तक्रारीचे अनुषंगाने करण्यात येणा-या पडताळणी व सापळा कारवाईकामी आम्ही दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार सुतार यांना त्यांची तक्रार तोंडी कथन करण्यास सांगितली असता तक्रारदार श्री सुतार यांनी त्यांची तक्रार तोंडी सांगितली. ती ऐकुन आम्ही तक्रारदार व पंच साक्षीदार यांना ला.प्र.वि. विभागाकडून करणेत येणा-या पुढील पडताळणी व सापळा कार्यवाहीबाबतची माहिती दिली. तसेच पुढील पडताळणी व सापळा कार्यवाही कामी पंच क्र.1 म्हणून श्री अनिल पंडित व पंच क्र.2 म्हणून श्री अमोल शिंदे हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना त्यांनी कथन केलेली तक्रार लिहून देण्यास सांगितले असता ती त्यांनी स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. पंचांनी ती तक्रार वाचुन पाहिली ती तक्रारदार यांनी कथन केल्याप्रमाणेच असल्याने त्यानंतर दोन्ही पंचानी व आम्ही देखील त्यावर सहया केल्या. तक्रारदार श्री सुतार यांची तक्रार पुढीलप्रमाणे होती. "माझे नाव श्री ऋषी अनंत सुतार असे असून मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास असुन माझा कन्स्ट्रक्शनचा व्यवसाय आहे. त्याबरोबरच मी समाजिक कार्य करतो. तसेच श्रीमती श्रुती अन्साने यांना शैक्षणिक कन्स्लटिंगकरीता मदत करतो.

सन 2024 मध्ये श्रीमती श्रुती अन्साने यांचे मार्फतीने शुक्रांत संतोष भोंगले नावाचा विद्यार्थी माझ्याकडे त्याचे AISSMS इंजिनिअरींग कॉलेज, पुणे येथे प्रथम वर्षाचे मॅकॅनिकल ब्रॉचचे अँडमिशनकरिता आला होता. माझी AISSMS कॉलेजमध्ये ओळख असल्याने मॅनेजमेंट कोटयामधुन अँडमिशन करुन देण्याची त्याने मला विंनती केली. त्यावेळी मी त्याला प्रवेश करून देण्यासाठी रु.4,50,000/- माझी कन्स्लटींग फी सांगितली होती व त्याने ती देण्यास सहमती दर्शविली होती. त्यानुसार आम्ही त्यांना प्रथम वर्ष मॅकेनिकल इंजिनिअरींगचा प्रवेश नियमानुसार

करुन दिला. तसेच प्रवेश झाल्यानंतर श्री शुक्रांत भोंगले याने मला अडीच लाख रुपये माझे बँक खात्यावर ट्रान्सफर केले. त्यानंतर काही दिवसानी तो परत माझ्याकडे आला व त्याने दुस-या वर्षासाठी ब्रँच ट्रान्स्फर करण्याची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, थकित रक्कम दयावी लागेल व ब्रँच ट्रान्स्फरसाठी अतिरिक्त दोन लाख रुपये लागतील. त्यांनी त्यास होकार दिला. मात्र आधीची थकित रक्कम त्याने दिली नाही. त्यामुळे आमचे वाद झाले. त्यामुळे त्याने त्याचा प्रथम वर्षाचा प्रवेश पुर्णपणे कायदेशीर व योग्य पध्दतीने करुन देखील माझ्या व माझी सहकारी श्रुती यांचे विरुध्द बंडगार्डन पोलीस ठाणे येथे तक्रार अर्ज केला. त्या तक्रार अर्जाची चौकशी पोलीस उपनिरीक्षक संदिप खेडकर यांचेकडे होती. त्यांनी मला दि.19/01/2026 रोजी चौकशीकरीता बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे बोलाविले होते. त्यावेळी मी त्यांची भेट घेतली असता माझ्याविरुध्द दाखल असलेल्या तक्रार अर्जावरुन फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी पी.एस.आय. खेडकर यांनी रु. 2,00,000/- दयावे लागतील असे मला सांगितले.

त्यावर मी काहीही प्रतिक्रिया न दिल्याने त्यांनी मला त्यांचे मोबा.क्र.9975863085 वरुन दि. 25/01/2026 रोजी व आज दि. 03/02/2026 रोजी माझे मोबा.क्र. 9922818878 यावर चौकशीकामी हजर राहण्याबाबत व्हॉट्सअँपद्वारे समजपत्र पाठविल्याने त्याबाबत मी माझे वकिल अँड श्री कुणाल खोपडे यांना माहिती दिली म्हणुन अँड. खोपडे यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 8390956976 यावरुन पीएसआय खेडकर यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 9975863085 यावर फोन केले असता त्यांनी आपण सेटलमेंट करु तुम्ही सुतार यांना घेवून भेटण्यासाठी या असे सांगितले. त्यानुसार मी व अँड. खोपडे असे त्यांना आज रोजी भेटण्यास जाणार आहोत. पीएसआय खेडकर हे स्वत:करीता मागणी करीत असलेली रु.2,00,000/- ही रक्कम कोणतीही शासकीय फी नसून लाच रक्कम असलेबाबत माझी खात्री आहे. तसेच पीएसआय खेडकर, अँड खोपडे व माझ्यात कोणतेही पुर्व वैंगनस्य अथवा आर्थिक हित संबंध नाहीत. त्यांच्या विरुध्द आपले विभागामाफत कायदेशीर कारवाई होणेस विंनती आहे."

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक पोलीस उपनिरीक्षक श्री खेडकर यांनी भेटण्यास कधी बोलावले आहे अशी विचारणा करता त्यांनी सांगितले की , तक्रारदार यांचे वकील श्री. खोपडे यांनी लोकसेवक यांचे मोबाईलवर फोन केला होता त्यावेळी लोकसेवक पी.एस.आय.श्री. खेडकर यांनी आजच भेटण्यासाठी बोलाविले आहे असे पंचांसमक्ष सांगितले. तसेच लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे वकील यांना बोलाविले असून आपण सेटलमेंट करू असे सांगितले असल्याने तक्रारदार व तक्रारदार यांचे वकील हे दोघेही लोकसेवक पोलीस उपनिरीक्षक खेडकर यांना भेटण्यास जाणार आहेत असेही पंचांसमक्ष सांगितले. तसेच त्यावेळी लोकसेवक हे तक्रारदारास थेटपणे किंवा वकिल अँड श्री. खोपडे यांचेकडे लाच मागणी करण्याची शक्यता आहे असे देखील सांगितले. त्यानुसार तक्रारदार व त्यांचे वकील अँड.श्री.खोपडे या दोघांनाही व्हाईस रेकॉर्डर लावून लाच मागणी पडताळणीकामी पाठविण्याचे ठरविण्यात आले तसेच तक्रारदार यांचे पडताळणी कारवाईचे अनुशंगाने निवेदन घेऊन त्यापाठोपाठ पंच क्र. 1 व 2 तसेच त्यापाठोपाठ अँड. श्री.खोपडे यांचे निवेदन घेण्याचे ठरवले.

त्यानंतर आम्ही सिल्व्हर रंगाचा व्हॉईस रेकॉर्डर मॉडेल नंबर ICD-UX560FU सिरीयल नंबर 2457505 असा असलेला तसेच दुसरा एक काळे रंगाचा व्हॉईस रेकॉर्डर मॉडेल नंबर ICD-UX560FU सिरीयल नंबर 2401028 असा असलेला दोन्ही पंच, तक्रारदार व त्यांचे वकिल यांना दाखवले. दोन्ही व्हाईस रेकॉर्डरचे मेमरी कार्ड स्लॉटमध्ये पुर्वीचे कोणतेही मेमरीकार्ड नसल्याची खात्री आम्हा पंचांना करुन दिली. तसेच व्हाईस रेकॉर्डरचे चालु-बंद व इतर कार्यक्षमतेबाबत माहिती दिली. त्यानंतर आमचेकडील साहित्यामधून एक नवीन सँनडिस्क कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे सिलबद पँकिंगमधील मेमरीकार्ड काढले त्याची पंचांचे समक्ष पाहणी केली असता त्याचे एका बाजुस SanDisk 32GBmicroSDHC I C4 व त्याचे मागील बाजुस MCP-K 11/25 56L8 CE 6S MMC32GBK9UOD–A2 Y8 AX215FD 2511 MADE IN TAIWAN असे छापलेले होते. सदरचे मेमरीकार्ड सिल्व्हर रंगाच्या व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकून त्यामध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याची खात्री करुन दिली. तसेच दुसरे एक नवीन व्हीएम एलाईट कंपनिचे 32 जीबी क्षमतेचे सिलबद पँकिंगमधील मेमरीकार्ड काढले त्याची पंचाचे समक्ष पाहणी केली असता त्याचे एका बाजुसC - VM ELITE 32 GB C10 U1 V10 micro SD HC I व त्याचे मागील बाजुस EETF32GMR0825 0032F5A55 K2523053063M असे छापलेले होते. सदरचे मेमरीकार्ड दुस-या काळया रंगाच्या व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकून त्यामध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याची खात्री करुन दिली.

त्यानंतर पडताळणी कारवाईवेळी नोंद करण्यात येणारे निवेदन हे व्हिडीओ चित्रीकरण करुन रेकॉर्ड करण्यात येणार असल्याने आमचेकडील साहित्यामधून नवीन व्हीएम एलाईट कंपनिचे 32 जीबी क्षमतेचे सिलबद पँकिंगमधील मेमरीकार्ड काढले. त्याची पंचाचे समक्ष पाहणी केली असता त्याचे एका बाजुस C- VM ELITE 32 GB C10 U1 V10 micro SD HC I व त्याचे मागील बाजुस EETF32GMR0825 0032F5A55

W2517044242M असे छापलेले होते. ते ला.प्र.वि.कडील सोनी कंपनीचे शासकीय व्हिडीओ कॅमेरामध्ये टाकून चित्रीकरण थेटपणे मेमरीकार्डमध्ये सेव्ह करण्याकरीता सेटिंग केली त्यानंतर तक्रारदार, पंच क्र.01 व 02 यांची पडताळणी कार्यवाही करीताची निवेदने सिल्व्हर रंगाचे व्हॉईस रेकॉरडरमध्ये तसेच अँड. श्री खोपडे यांचे पडताळणी कार्यवाही करीताचे निवेदन काळ्या रंगाच्या व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत केली ती वेळ 20.20 ते 20.24 वा.ची होती. सिल्व्हर रंगाचा व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन लगेच दुसरा काळ्या रंगाचा व्हॉईस रेकॉर्डर चालु केला त्यामध्ये अँड. श्री खोपडे यांचे निवेदन ध्वनिमुद्रीत केले. ती वेळ 20.24 ते 20.25 वा.ची होती.

त्यानंतर तक्रारदार श्री सुतार व त्यांचे वकिल अँड खोपडे यांना लोकसेवक श्री. संदिप खेडकर यांच्याकडे पाठवून तक्रारदार यांचेकडे लोकसेवक त्यांचे शासकीय कामाकरीता लाचेची मागणी आहे अगर कसे? याकरीताचे पडताळणी करण्याकरीता तक्रारदार व अँड खोपडे यांना लोकसेवक बोलावतील त्या ठिकाणी पाठवून पडताळणी करणार असल्याचे सर्वांना कळविले. तक्रारदार यांचे वकील यांना लोकसेवक यांनी बोलावून आपण सेटलमेंट करू असे सांगितले असल्याने तक्रारदार यांचे वकील अँड.श्री. खोपडे यानी लोकसेवक याना कोठे भेटायचे याची खात्री करण्यासाठी अँड खोपडे यांचे मोबाईलवरून लोकसेवक श्री. खेडकर यांचे मोबाईलवर कॉल करून खात्री करण्याचे ठरविण्यात आले. सदरचा कॉल हा सिल्व्हर रंगाचे व्हाईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार अँड.श्री. खोपडे यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 8390956976 यावरुन पीएसआय खेडकर यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 9975863088 यावर फोन लावुन कॉल स्पिकरवर ठेवला. अँड. खोपडे यांनी कुठे भेटायचे असे लोकसेवक खेडकर यांना विचारले असता आवाज स्पष्ट न आल्याने फोन कट केला. पुन्हा फोन लावला असता लोकसेवक खेडकर यांनी तक्रारदार व अँड. खोपडे यांना ताडीवाला रोड पोलीस चौकी येथे येण्यास सांगितले. सदरचे संभाषण ध्वनिमुद्रित करण्यात आले. ती वेळ 20.39 ते 20.40 वा.ची होती. त्यानंतर तक्रारदार व अँड. खोपडे यांना पंच क्र. 1 श्री पंडित यांचेसह तात्काळ लोकसेवक श्री खेडकर यांनी बोलाविलेल्या ताडीवाला रोड पोलीस चौकी या ठिकाणी पडताळणी कारवाईकामी पाठविण्याचे ठरवीले. त्याअनुषंगाने आम्ही उपस्थित दोन्ही पंच, तक्रारदार, अँड श्री खोपडे व सापळा पथकास पडताळणी कारवाईचे अनुशंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर तक्रारदार श्री सुतार यांना सिल्व्हर रंगाचा व्हॉईस रेकॉर्डर 20.43 वाजता चालू करून पोशि तावरे यांचे मार्फतीने लावुन दिला. तसेच काळ्या रंगाचा व्हॉईस रेकॉर्डर पोहवा जाधव यांनी 20.42 वा.चालु करून अँड.खोपडे यांचेकडे दिला व तक्रारदार तसेच अँड. खोपडे यांना पंच क्र.01 श्री. पंडित यांचेसोबत अँड खोपडे यांचे अमेझ कार नं. MH12 VT0302 या वाहनाने 20.45 वा. ताडीवाला रोड पोलीस चौकी येथे पडताळणीकरीता रवाना केले. ताडीवाला रोड पोलीस चौकी ही लाप्रवि कार्यालयापासुन जवळ असल्याने सापळा पथक व पंच क्र.2 हे लाप्रवि कार्यालयात थांबुन राहिले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार, अँड. श्री कुणाल खोपडे व पंच क्र.1 असे ताडीवाला रोड पोलीस चौकी येथून लोकसेवक पोलीस उप निरीक्षक श्री खेडकर यांची भेट घेवून लाप्रवि कार्यालयात परत आले.

त्यावेळी पोशि. प्रविण तावरे यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन आमचेकडे दिला ती वेळ 21.55 वा. होती. तसेच पो.हवा.जाधव यांनी अँड. खोपडे यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन तो त्यांनी बंद करून आमचे ताब्यात दिला ती वेळ 21.54 वा.ची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र.2 यांचे समक्ष पंच क्र.1 श्री पंडीत यांना ते गेल्यापासुन परत येईपर्यंत हकिकत विचारली असता त्यांनी सांगितले की, ते व तक्रारदार तसेच अँड. खोपडे असे खोपडे यांचे चारचाकी वाहन अमेझ नं.MH 12 VT 0302 हीमधुन जावुन ताडीवाला पोलीस चौकीपासुन अंदाजे 100 मीटर अलिकडे रस्त्याचे बाजुला थांबले व तेथे कार पार्क केली. पंच क्र. 1 व अँड. खोपडे असे ताडीवाला पोलीस चौकी येथे पायी गेले. तक्रारदार हे गाडीतच थांबुन राहिले. तेथे गेल्यानंतर चौकीचे खालच्या मजल्यावर एक पीएसआय युनिफॉर्ममध्ये फोनवर बोलत बसले होते. ते फोनवर बोलत असल्याने पंच क्र. 1 व खोपडे हे जावुन त्यांचे समोरील खुर्च्यावर बसले. त्यावेळी पंच क्र. 1 यांनी त्यांचे युनिफॉर्मवरील नेमप्लेट वाचली असता तेच लोकसेवक संदिप खेडकर असल्याचे समजले. त्यानंतर अँड. खोपडे व लोकसेवक खेडकर यांचेमध्ये तक्रारदार यांचेविरुद्ध दाखल अर्जासंबंधी तसेच इतर आवांतर चर्चा झाली. त्यानंतर लोकसेवक, अँड श्री खोपडे व पंच क्र. 1 असे सर्व चौकीमधील वरच्या मजल्यावर लोकसेवक खेडकर बसतात तेथे गेले. त्यावेळी चर्चेदरम्यान अँड खोपडे यांनी लोकसवेक यांना तक्रारदार आल्याचे सांगितले असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांना बोलावून घ्या असे सांगितले. म्हणुन अँड. खोपडे यांनी त्यांचे मोबाईलवरुन तक्रारदार यांना फोन लावुन बोलावुन घेतले. काही वेळातच तक्रारदार तेथे आले. तेथे तक्रारदार, अँड खोपडे व लोकसेवक खेडकर यांचेमध्ये पुढील प्रमाणे संभाषण झाले. लोकसेवक खेडकर तक्रारदार यांना बोलले की, "बघू ते.. मी काय म्हणल तेवढ केल असता ना सगळंच क्लोज करुन टाकणार....ते बघायला नको काय." त्यानंतर तक्रारदार सुतार म्हणाले, "बर ठिकय.चला तुम्ही त्याला एकदा बोलवा परवा..उदया." त्यावर खेडकर म्हणाले की, "त्याला बोलवतो मी." त्यावर तक्रारदार सुतार हे,



लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे

| | | |
|---|---|---|
| | [illegible] | 3/4/2023 |
| 5 | अनुसया गंगाधर डोणे | 3/4/2023 |
| 6 | राजेंद्र अंकुश सदगर | 8/4/2023 |

लोकसेवक खेडकर म्हणाले की, “तेवढ हे करा… त्याला म्हणजी कस…
“परवा येतो परत” असे बोलले असता लोकसेवक खेडकर म्हणाले की, “तेवढ हे करा… त्याला म्हणजी कस… काही तरी मिळाले मला.” त्यावर तक्रारदार म्हणाले की, “आकडाच त्याला बी थोड… त्यो बी जरा शांत होईल ना…काही तरी मिळाले मला.” त्यावर तक्रारदार म्हणाले की, “एक सांगितल ना?” त्यावर सुतार “हो” असे म्हणाले. नाही सांगितला पण” तेव्हा लोकसेवक खेडकर म्हणाले की, “एक सांगितल ना?” असे म्हणाले असता लोकसेवक म्हणाले की, “नाय नाय ते त्यावर तक्रारदार, “त्याचा नाय ना विषय त्यात काय” असे म्हणाले असता लोकसेवक म्हणाले की, “ठीकय, चालेल” असे बोलले असता दोन्ही बी त्यात..मिटवून टाकू..सगळ मिटवतो…सगळ.” त्यानंतर तक्रारदार “ठीकय, चालेल” असे बोलले असता लोकसेवक खेडकर म्हणाले की, “एक मधी दोघांच बी मिटवून टाकू…हयाच बी…माझ…सगळाच विषय मिटवतो.” त्यावर तक्रारदार सुतार हे “ठिकय” असे बोलले असता लोकसेवक खेडकर म्हणालेबंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर की, “कसय, माझ वैयक्तिक येतच नाय… ती साहेबांना बी द्याव लागत्यात. साहेबांनी म्हणले हयात गुन्हा दाखल करा…वर्दी शप्पत साहेबांनी म्हणले यात गुन्हा होतो. … त्यांच दोघांचे स्टेटमेंटहेत…म्हणले की पैशासाठी आणि नोकरी लावण्याच आमिष देवुन पैसे घेतले…साहेबांला” त्यावर तक्रारदार हे लोकसेवक खेडकर यांचेशी तक्रार अर्जामधील व्यवहारासंदर्भात बोलतात. तक्रारदार म्हणाले की, “पण आकडा बघा मी व्यवहारातुन खरा सांगितलाय तुम्हाला.” त्यावर लोकसेवक खेडकर “नाय सांगितला की” असे बोलतात.. त्यानंतर लोकसेवक म्हणालेकी, “मी त्याच स्टेटमेंट बघितलय म्हणुन मी म्हणल मला अडीच तीन लाख रुपये आले.. उलट पन्नास जास्त सांगितले.” त्यावर खेडकर म्हणाले की, “मीच त्यांना साहेबांना सांगितल साहेब…मदत केलीय.” त्यावर तक्रारदार सुतार हे वकिल खोपडे यांना उद्देशुन “एक लाखामध्ये तुम्ही साहेब करुन घ्या.” असे बोलले असता अँड खोपडे “तुम्ही पैसे देणारयत माझ काय मधी…तुमच मिटवा तुम्ही…मला कशाला” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार सुतार खेडकर यांना म्हणाले की,“मं. उद्याचा एक दिवस जावुद्या, जे काय एक लाख रुपयेत ते तुमच्याकडे पाठवुन देतो. … मी फक्त उद्या पेपर पाठवुन देतो कारण का त्या शुक्रांतला बोलावुन घेताल ना… तुम्ही त्याला.” त्यावर लोकसेवक खेडकर हे “त्याला मी… करतो मी काय करायचय” असे म्हणाले.

अशी हकिकत पंच क्र.2 यांचेसमक्ष सांगीतली. त्यानंतर तक्रारदार व अँड. खोपडे यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत माहिती विचारली असता, त्यांनीही पंच क्र 1 यांनी सांगीतलेल्या प्रमाणेच मिळतीजुळती हकिकत पंच क्रं 2 यांचे समक्ष सांगीतली.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष पडताळणी कारवाई दरम्यानचे दोन्ही व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता, तक्रारदार, अँड. खोपडे व पंच क्र 1 यांनी सांगितल्याप्रमाणे संभाषण असल्याची खात्री झाली. सदर संभाषणामध्ये पोलीस उपनिरीक्षक श्री संदिप खेडकर यांनी तक्रारदार यांच्याकडे स्वत:करिता व त्यांचे साहेबांकरीता तक्रारदार यांचेविरूध्द दाखल असणारे अर्जामध्ये गुन्हा दाखल न करण्यासाठी 1,00,000/- रुपयांची मागणी करून परवा म्हणजेच दिंनाक 05/02/2026 रोजी लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार यांना पोलीस उप निरीक्षक श्री. खेडकर यांचे साहेबांकडे पुढील कारवाई बाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, लोकसेवक खेडकर हे त्यांचे वरीष्ठांशी भेट घालुन देणार नाहीत त्यामुळे त्यांचेकडे पडताळणी करता येणार नाही. तसेच त्यांची तक्रार केवळ पोलीस उपनिरीक्षक खेडकर यांचेविरुध्दच असल्याने त्यांना इतर कोणाकडेही पडताळणी करायची नाही. म्हणून आम्ही तक्रारदार यांना पुढील सापळा कारवाई बाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, पडताळणी दरम्यान परवा लाच रक्कम लोकसेवक यांना देण्याचे ते बोलले असल्याने दि.05/02/2025 रोजी सापळा कारवाई करण्यात यावी अशी दोन्ही पंचासमक्ष आम्हास विंनती केल्याने दि.03/02/2026 रोजीची कारवाई स्थगित करणेत आली.·सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनेवरुन दि.05/02/2026 रोजी दोन्ही पंच व सापळा पथक सकाळी 10.00 वाजता आमचे कक्षात हजर झाले. सदर दिवशी तक्रारदार यांनी आम्हास फोनद्वारे कळविले की,
, त्यांचेकडे लाच रक्मे‍ेच्या पैशांची व्यवस्था न झाल्याने ती व्यवस्था करुन ते दुपार नंतर ला.प्र.वि. कार्यालयात येणार असल्याचे‍े कळवून सुमारे 18.15 वाजता आमचे कक्षात हजर झाले व त्यांनी सांगितले की, लोकसेवक पोउपनि खेडकर व त्यांच्या ओळखीचे इसम श्री सुफीयान यांचा तक्रारदार यांना व्हॉट्सअँप कॉल आला व सुफीयानने सांगितले की, ते ताडीवाला रोड चौकी येथे लोकसेवक खेडकर यांचे समोर बसलेले असून त्यांनी फोन लोकसेवक खेडकर यांच्याकडे दिला. त्यावेळी खेडकर यांनी संध्याकाळी 07.00 वाजेपर्यंत काल ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम घेवुन येण्यास मला सांगितले आहे, असे तक्रारदार यांनी सांगितल्याने सर्वानुमते सदर दिवशी लोकसेवक खेडकर यांचेविरुध्द सापळा कारवाई आजमाविण्याचे ठरविले.

त्याप्रमाणे सापळापुर्व कारवाईचे नियोजन सुरू असताना त्या दरम्यान तक्रारदार यांना मध्यस्थी व्यक्ती सुफीयान यांने सुमारे 18.21 वाजता फोन करून सांगितले की, पीएसआय खेडकर यांनी तक्रारदार यांच्या विरुध्द

अर्ज देणा-या इसमास देखील ताडीवाला पोलीस चौकी येथे बोलाविले असून तक्रारदार व त्यांना समोरासमोर वसून प्रकरण मिटवायचे आहे. तसेच तक्रारदार यांचे विरुध्द अर्ज करणा-या इसमास तक्रारदार यांचेविरुध्द कारवाई करत असल्याचे गाजर दाखवायचे आहे. त्यामुळे सुफीयाने याने तक्रारदार यांना पोलीस चौकी येथे सायंकाळी 19.00 वाजता पर्यंत बोलाविले होते. त्यानंतर पुन्हा थोडयाच वेळात सुफीयान याने तक्रारदार यांना फोन करून त्याला महत्वाचा कॉल आल्याने बाहेर जावे लागणार असल्याने पीएसआय खेडकर यांनी भेट रद्द करून नंतर आरामात बघु आत्ता येवू नका असे सांगितल्याचे तक्रारदार यांना सांगितले. त्याबाबत खात्री करण्याकरीता तक्रारदार यांनी लोकसेवक खेडकर यांना साधा कॉल केला असता संपर्क झाला परंतु लोकसेवक खेडकर यांनी जास्त काही न बोलता फोन कट केला. त्यानंतर तक्रारदार यांनी व्हॉटस् ॲप कॉल तसेच मॅसेजद्वारे संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता लोकसेवक खेडकर यांनी काहीही प्रतिसाद दिला नाही. वरिल सर्व फोन कॉलवरील संभाषण व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदर दिवशीची कारवाई सर्वानुमते स्थगित करण्यात आली. त्यानंतर दि. 16/02/2026 रोजी तक्रारदार हे ला.प्र.वि. पुणे कार्यालयात हजर होवून दोन्ही पंचासमक्ष सांगितले की, त्यांचेविरुध्द बंडगार्डन पोलीस ठाणे येथे दाखल असलेला तक्रार अर्ज लोकसेवक खेडकर यांनी निकाली काढला असल्याची माहिती त्यांना त्यांचे वकिल कुणाल खोपडे यांचेकडून मिळाली आहे. त्यामुळे भविष्यात ते तक्रारदार यांचेकडून मागणी केलेली लाच रक्कम स्वीकारणार नाहीत. त्यामुळे सर्वानुमते पुढील सापळा कारवाईचे कामकाज बंद करण्यात आले.

तरी दि.03/02/2026 रोजी तक्रारदार श्री.ऋषि अनंत सुतार यांनी लोकसेवक पोलीस उपनिरीक्षक श्री. संदिप खेडकर यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबधक विभाग पुणे कार्यालय येथे दिलेल्या तक्रारीवरून सदर दिवशी बंडगार्डन पोलीस ठाणे अंकित ताडीवालारोड पोलीस चौकी येथे करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईवेळी सुमारे 20.45 ते 21.55 वा. चे दरम्यान झालेल्या संभाषणामध्ये यातील लोकसेवक पोलीस उपनिरीक्षक श्री. संदिप खेडकर यांनी तक्रारदार श्री. सुतार यांचेविरुध्द बंडगार्डन पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या तक्रार अर्जावरून चौकशी अधिकारी म्हणून तक्रारदार यांचेविरुध्द गुन्हा दाखल न करण्यासाठी पंच श्री. अनिल पंडीत व वकिल श्री कुणाल खोपडे यांचे समक्ष तक्रारदार यांचेकडे स्वत:करीता व वरिष्ठाकरीता रु.1,00,000/- (एक लाख रुपये) लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने माझी पोलीस उपनिरीक्षक श्री. संदिप खेडकर नेमणुक- बंडगार्डन पोलीस ठाणे, पुणे शहर यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम 1988 चे कलम 7, 7अ अन्वये सरकारतर्फे कायदेशिर फिंयाद आहे.

माझा वरील फिंयादी जबाब माझे सांगणे प्रमाणे मराठीत टंकलिखीत केला असून तो बरोबर व खरा आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Santosh Laxman Pandhre(I (Inspector)) / DGPSLPM7301 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)
(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Vinamita ACP Nita Misal

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Santosh Laxman Pa
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): DGPSLPM7301

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)